बीड । शनिवार
३१.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ६०
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# 2,652 लाडक्या बहिणी निघाल्या सरकारी कर्मचारी; शासन करणार वसुली



**मुंबई । प्रतिनिधी**

लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा राज्य सरकारी कर्मचारीमहिलांनी घेतल्याच्या तक्रारी आल्यानंतर १ लाख ६० हजार ५५९ महिला-पुरुष कर्मचाऱ्यांची तपासणी केली असता २ हजार ६५२ महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेचे पैसे लाटल्याचे उघडकीस आले आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागाला सामान्य प्रशासन विभागाने १ लाख ६० हजार कर्मचाऱ्यांचा युआयडी डेटा उपलब्ध करून दिला. सेवार्थ प्रणालीवर या कर्मचाऱ्यांची नावे नोंदविलेली होती. त्यापैकी किती महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला, हे तपासण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली होती. त्यात २६५२ महिला कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात थेट पैसा गेला असे निदर्शनास आले. त्यांनी ऑगस्ट २०२४ पासून एप्रिलपर्यंत म्हणजे ९ महिन्यांत प्रत्येकी १३ हजार ५०० रुपये घेतले. याचा अर्थ ३ कोटी ५८ लाखांची कमाई त्यांनी केली.

**आता ज्या २,६५२ महिला कर्मचाऱ्यांनी लाडक्या बहिणी बनून पैसा उचलला त्यांच्याकडून आता या रकमेची (३ कोटी ५९ लाख रु.) वसुली करण्यात येणार आहेत. प्रत्येक विभागाला त्या बाबतचा आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून लवकरच सर्व शासकीय विभागांना देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.**

सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही असे शासन निर्णयातच स्पष्ट करण्यात आले होते. तरीही त्यांनी अर्ज भरले आणि लाभही उचलले. त्यात वर्ग तीन आणि वर्ग चारच्या महिला कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. आणखी सहा लाख कर्मचाऱ्यांची अशाच पद्धतीने तपासणी केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. ८ लाख ८५ हजार महिलांनी नमो शेतकरी योजना आणि लाडकी बहीण या दोन्ही योजनांचा आर्थिक लाभ उचलल्याचे तपासात आढळून आले आहे. त्यांनी लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये म हिन्याकाठी उचलले. त्याचवेळी केंद्र व राज्य सरकारकडून नमो शेतकरी योजनेत प्रत्येकी सहा हजार (एकूण १२ हजार रु.) घेतले. याचा अर्थ वर्षाकाठी त्यांना ३० हजार रुपये मिळाले.

▶▶ उर्वरित पान २ वर

## ठाण्यातील देशद्रोही रवी वर्माने १४ पाणबुड्या आणि युद्धनौकांची माहिती पाकला कशी पाठवली?

**ठाणे । प्रतिनिधी**

यूट्यूबर ज्योती मल्होत्रा प्रकरण ताजं असतनाच महाराष्ट्र एटीएसने काल संध्याकाळी पाकिस्तानसाठी हेरगिरी करत संवेदनशील माहिती पुरवल्या प्रकरणी एकाला अटक केली आहे. ठाण्यातील कळवा येथील रविकुमार वर्माचा असे आरोपीचे नाव आहे. तो नेव्हल डॉकमध्ये ज्युनियर मेकॅनिकल इंजिनियर म्हणून काम करतो. त्याने भारतातील १४ पाणबुड्या आणि युद्धनौकांची माहिती पाकिस्तानला पुरवली होती. आता ही माहिती कशा प्रकारे



होती. नेव्हल डॉकमधल्या परिसरात मोबाईल नेण्यास बंदी असल्याने आरोपी रवी वर्मा तिथल्या युद्धनौकांचे स्ट्रक्चर आणि इतर माहिती लक्षात ठेवायचा. त्यानंतर ती संपूर्ण माहिती पायल शर्मा आणि इस्प्रीत या ▶▶ उर्वरित पान २ वर

## नेवासा: सिनेस्टाईल पाठलाग करून ६ ट्रॅक्टर चोरट्यांना २४ तासांत अटक



**नेवासा । प्रतिनिधी**

बकुपिंपळगाव (ता. नेवासा) येथील गणेश पोपट शिंदे यांच्या घरासमोरील शेडमधून चोरलेला स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर विक्रीसाठी नेणाऱ्या सहा चोरट्यांना नेवासा पोलिसांनी अवघ्या २४ तासांत जेरबंद केले. पोलीस उपाधीक्षक संतोष

▶▶ उर्वरित पान २ वर

## VIP गेस्टला 'एक्स्ट्रा सर्व्हिस' न दिल्याने झालेली अंकिता भंडारीची हत्या, माजी BJP नेत्याचा मुलाला जन्मठेप

**ऋषिकेश (उत्तराखंड)**

बहुचर्चित अंकिता भंडारी हत्या प्रकरणात कोटद्वार जिल्हा न्यायालयाने निकाल दिला आहे. सुमारे २ वर्षे ८ महिन्यानंतर हा निकाल आला आहे. न्यायालयाने या हत्या प्रकरणात माजी भाजप नेत्याचा मुलगा पुलकित आर्य त्याचे साथीदार सौरभ भास्कर आणि अंकित गुप्ता या तिघांना दोषी ठरवले आहे. त्यांना जन्म ठेपेची शिक्षा सुनावण्यासोबतच तिघांनाही ५०,००० रुपये दंडही ठोठावण्यात आला आहे.



या प्रकरणात हायप्रोफाइल लोकांची नावे आल्याने ही घटना चर्चेत आली. तखझ लोकांची नावं समोर आल्यानंतर, या प्रकरणात अनेक वळणे आली. ५०० पानांच्या आरोपपत्रासोबतच या प्रकरणात ९७ साक्षीदारही सादर करण्यात आले.

कोर्टाने काय दिला निर्णय?- खरं तर, या संपूर्ण प्रकरणाची सुनावणी सकाळी १०.३० वाजता कोटद्वारच्या अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयात सुरू झाली. संपूर्ण देशाचे लक्ष या निर्णयावर लागले होते. सध्या तिन्ही आरोपींना दोषी ठरवण्यात आले आहे आणि त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या तिघांनाही ५० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या प्रकरणात, पुलकित आर्यवर खझउ कलम ३०२ (खून), २०१ (पुरावे नष्ट करणे), ३५४ (लैंगिक छळ) आणि अनैतिक वाहतूक प्रतिबंधक ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिखर शिंगणापूरला जाताना अपघातात आजी-नातवाचा मृत्यू; पाच जखमी

### तुळजापूर-लातूर महामार्गावर पहाटेचा अपघात

**धाराशिव । प्रतिनिधी**

बोअरवेलला लागलेल्या पाण्याच्या आनंदात शिखर शिंगणापूर येथे महादेवला पाण्याचा अभिषेक घालण्यासाठी निघालेल्या गीर कुटुंबीयाच्या चारचाकी वाहनाला अपघात झाला. यामध्ये पाचवर्षीय बालकासह आजीचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी पहाटे तुळजापूर- लातूर रस्त्यावर वडगाव लाख गावानजीक पुतावर घडली. यात पाचजण गंभीर जखमी झाले आहेत. पोमादेवी जवळगा (जि. औसा) येथील गीर कुटुंबीयाने मागील महिन्यात शेतात घेतलेल्या बोअरवेलला पाणी लागले होते. बोरअच्या पाण्याने शिखर शिंगणापूर येथील महादेवाला ▶▶ उर्वरित पान २



## आगामी दीपावलीचा 'आकाश दिवा' घरकूल लाभार्थ्यांच्या स्वत:च्या घरात लागावा: आ.सुरेश धस

● **दिवाळी नवीन घरकुलात.. यासाठी कार्यशाळेचे आयोजन**

**आष्टी। प्रतिनिधी**

ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या घरकूल योजनेअंतर्गत सर्वसामान्य लाभार्थ्यांच्या स्वतःच्या नवीन घरात दिवाळी साजरी करून



त्यांच्या जीवनात नवचैतन्य व भरभराटी व्हावी अशी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भावना असून त्यानुसार आगामी दीपावलीचा आकाश दिवा, आणि पणती ▶▶ उर्वरित पान २ वर

● **घरकुल नियंत्रण कक्षाद्वारे मदत...!**

**आष्टी पंचायत समिती कार्यालयामध्ये घरकुल विभाग करिता स्वतंत्र नियंत्रण कक्ष सुरू करत, घरकुलाच्या बाबतीमध्ये येणाऱ्या अडचणीवर जिल्हा परिषद गट नुसार अधिकाऱ्यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करून तातडीने अडचणी सोडवत दिवाळीपूर्वी घरकुलाची कामे पूर्ण होतील यासाठी या माध्यमातून मदत केली जाणार आहे.**

## बिंदुसरा धरणात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या धोक्याविषयी तातडीने उपाययोजना करावी: अनिल जगताप

**बीड । प्रतिनिधी**

मागील काही महिन्यांतील अतिवृष्टीमुळे बिंदुसरा धरण ओसंडून वाहत आहे. त्यामुळे बीड शहरासह परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेला धोका निम र्ण झाला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांचे जीवित आणि म ालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड जिल्हाधिकारी आणि नगर परिषद



बीडचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनामध्ये धरण परिसरात प्रवेशबंदी करावी, धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचे नियोजनबद्ध नियमन करावे, नागरिकांना पूर्वसूचना देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी, संभाव्य पूरग्रस्त भागात जिल्हा प्रशासनाने वेळेवर माहिती द्यावी, ग्रामीण भागात मदत व बचाव कार्यासाठी यंत्रणा तत्पर ठेवावी अशी मागणी करण्यात आली आहे.

सध्याची परिस्थिती पाहता भविष्यात मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने कृती करावी. असेही शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी निवेदनामध्ये नमूद केले आहे.

## सतरंजीने हायपाय बांधून मारले, पैसेही लुटले



### बीडच्या SP कडून टोळीवर मोक्का, चौघांना अटक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील गुन्हेगारी कारवायाच्या घटनांवर पोलिसांकडून कडक कारवाई केली जात आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणानंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. त्यानंतर, राज्य सरकारने या घटनेची गंभीर दखल घेत येथील पोलीस अधीक्षकांची बदली केली. त्यामुळे, येथे नवनीत कावत या नव्याने पदभार स्वीकारलेल्या पोलीस अधीक्षकांकडे बीडची जबाबदारी देण्यात आली. कावत यांनी बीडमधील गुन्हेगारांवर वचक बसवत थेट मोक्काअंतर्गत कारवाईला सुरुवात केली आहे. वाल्मिक कराड आणि गँगवर मोक्का ▶▶ उर्वरित पान २ वर



पान १ वरून पुढे...

## 2,652 लाडक्या...

कोणत्याही सरकारी योजनांद्वारे एकत्रितपणे २१८ हजार रुपयेच दिले जातील, असा शासनाचा नियम आहे. त्यामुळे आता यापुढे या महिलांना नमो शेतकरी योजनेचे १२ हजार आणि लाडकी बहीण योजनेतून ६ हजार रुपये मिळतील.

## ठाण्यातील देशद्रोही...

अकाउंटला पाठवायचा. तो ही माहिती ऑडियो आणि टेक्स्ट स्वरूपात तसेच चित्र काढून पाठवायचा असेही तपासात समोर आले आहे. २०२४ पासून पाकच्या संपर्कात– रवी वर्मा नोव्हेंबर २०२४ पासून पाकिस्तानी फेसबुक अकाउंटच्या संपर्कात आला होता. पाकिस्तानी इंटेलिजन्स ऑपरेटिव्हची फेसबुक अकाऊंट असलेल्या पायल शर्मा आणि इस्प्रित या खात्यावरून एका प्रोजेक्टसाठी युद्धनौकांची माहिती हवीय अशी मागणी रवी वर्माकडे होत होती. हनी ट्रॅपमध्ये अडकलेला रवी वर्मा ही माहिती पायल शर्मा आणि इस्प्रितला वारंवार पाठवत होता.

रवी वर्माचं मोडलं लग्न– यादरम्यान रवी वर्मा संदर्भात आणखी एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. एटीएसने काल कारवाई करून रविकुमारला ताब्यात घेतल्यानंतर त्याचं ठरलेलं लग्न मोडलं आहे. काही दिवसांपूर्वीच त्याच्या आईने रविकुमारचं लग्न ठरवलं होतं. मात्र आता हेरगिरीच्या आरोपाखी एटीएसने त्याला अटक केल्यानंतर रविकुमारचं जिच्याशी लग्न ठरलं होतं, त्या कुटुबियांनी हे लग्न करण्यास नकार दिला आहे.

## नेवासा: सिनेस्टाईल...

खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने सिनेस्टाईल पाठलाग करून ही धडक कारवाई केली. या कामगिरीचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. गणेश शिंदे यांनी आपला ट्रॅक्टर चोरीला गेल्याची तक्रार नेवासा पोलीस ठाण्यात नोंदवली होती. यानंतर उपाधीक्षक संतोष खाडे यांनी तपासाची सूत्रे हाती घेत तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांच्या माहितीवरून प्रवरासंगम परिसरात सापळा रचला. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास चोरलेला ट्रॅक्टर टाटा एसी कंपनीच्या मालवाहू गाडीतून नेत असल्याचे पोलिसांना आढळले. पोलिसांची चाहूल लागताच चोरट्यांनी सिद्धेश्वरमार्गे पळ काढला. मात्र, गुन्हे शोध पथकाने गोधेगाव–भालगाव शिवारात पाठलाग करून गाडी ताब्यात घेतली.

या कारवाईत मयूर संजय भोसले (वय २०, रा. कासारवाडी, ता. पाथर्डी), महेश ज्ञानेश्वर मुजमुले (वय २०, रा. जवखेडे, ता. पाथर्डी), महेश अशोक बारुडे (वय २७, रा. प्रवरासंगम, ता. नेवासा), रविंद्र मारकस मोरे (वय २४, रा. बकुपिंपळगाव, ता. नेवासा), प्रणव कृष्णा पवार (वय २२, रा. प्रवरासंगम, ता. नेवासा) आणि दुर्गेश बाबासाहेब बेडकर (वय १९, रा. प्रवरासंगम, ता. नेवासा) यांना अटक करण्यात आली.

पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे, सहायक पोलीस निरीक्षक पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार अजय साठे, आप्पासाहेब तांबे, सुमित करंजकर, अविनाश वैद्य, नारायण डमाळे, श्रीनाथ गवळी, राम वैद्य, भारत बोडखे, गणेश जाधव आणि श्रीरामपूर सायबर सेलचे सचिन धनक यांनी ही कारवाई यशस्वी केली.

पान १ वरून पुढे...

## VIP गेस्टला...

कायद्याअंतर्गत गंभीर आरोप निश्चित करण्यात आले आहेत. त्याच वेळी, इतर दोन आरोपींवर हत्येत मदत करणे आणि अनैतिक कृत्यांमध्ये सहभागी असल्याचा आरोप आहे. ९७ साक्षीदार – ५०० पानांचं आरोपपत्र– या प्रकरणाचा तपास करण्यासाठी SIT(विशेष तपास पथक) स्थापन करण्यात आली होती. डखढने ५०० हून अधिक पानांचे आरोपपत्र दाखल केले होते. या संपूर्ण घटनेत ९७ साक्षीदारांची नावे देखील होती, त्यापैकी सरकारी वकिलांनी त्यांच्या वतीने ४७ साक्षीदार सादर केले होते.

काय आहे संपूर्ण प्रकरण ?– १८ सप्टेंबर २०२२ रोजी अंकिता भंडारी अचानक गायब झाली तेव्हा हे संपूर्ण प्रकरण सुरू झाले. १९ वर्षीय अंकिता ऋषिकेशमधील वनंतरा रिसॉर्टमध्ये रिसेप्शनिस्ट म्हणून काम करत होती. १८ सप्टेंबर रोजी ती अचानक गायब झाली. वडिलांनी रिसॉर्टमध्ये पोहोचून याबद्दल चौकशी केली, पण ती सापडली नाही. त्यानंतर वडिलांनी मुलीची बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. संशयाच्या आधारे पोलिसांनी रिसॉर्ट मालक पुलकित आर्यची चौकशी केली, त्यानंतर त्याने सांगितले की अंकिता मानसिक तणावातून जात होती.

पुलकितने रचलेली भलतीच कहाणी– पुलकितने पोलिसांना सांगितले की, मानसिक ताणतणावामुळे अंकिता १८ तारखेला तिच्या मैत्रिणींसोबत ऋषिकेशला गेली होती आणि रात्री उशिरा तिच्या खोलीत परत गेली आणि झोपली. पण १९ सप्टेंबर रोजी सकाळी ती तिच्या खोलीतून गायब होती. पण पोलिसांना यावर विश्वास बसला नाही आणि त्यांची शंका अधिकच वाढू लागले.

शंका दूर करण्यासाठी पोलिसांनी सीसीटीव्ही तपासले– पुलकितचे म्हणणे ऐकल्यानंतर पोलिसांनी रिसॉर्ट कर्मचाऱ्यांची चौकशी केली. रिसॉर्ट कर्मचाऱ्यांनी सांगितले की, अंकिता त्यांच्यासोबत गेली होती पण ती परत आली नाही. याची खात्री करण्यासाठी पोलिसांनी ऋषिकेशला जाणाऱ्या आणि येणाऱ्या सर्व मार्गांवर लावलेले सीसीटीव्ही तपासले. या तपासात असे समोर आले की अंकिता रिसॉर्टमध्ये परतलीच नव्हती.

कालव्यात सापडला मृतदेह – पुलकितची कहाणी आता पोलिसांसमोर उघड झाली आणि आता त्याची कडक चौकशी करण्यात आली. अंकिताचा शोध घेण्यासाठी सोशल मीडियावरही अनेक प्रकारच्या मोहिमा चालवल्या जात होत्या. पोलिसांच्या चौकशीसमोर पुलकित फार काळ टिकू शकला नाही आणि त्याने सांगितले की त्यानेच अंकिताला गंगेत ढकलले. त्यानंतर ऋषिकेशजवळील चिल्ला कालव्यात अंकिताचा मृतदेह सापडला होता. पोलीस तपासात ही मोठी माहिती समोर आली– पोलीस तपासात पुलकितसोबत त्याच्या दोन साथीदारांची नावेही समोर आली. प्रत्यक्षात, पुलकित अंकितावर चुकीचे काम करण्यासाठी दबाव आणत असे. रिसॉर्टमध्ये काम करताना, पुलकितने अंकिताला तेथील 'VIP' पाहुण्यांना 'एक्स्ट्रा सर्व्हिस' देण्यास भाग पाडले होते, ज्याचा तिने विरोध केलेला. यामुळे संतप्त झालेल्या पुलकितने त्याच्या दोन साथीदारांसह अंकिताला चिल्ला कालव्यात ढकलून तिची हत्या केली होती.

जमावाने जाळून टाकलेला रिसॉर्ट –अंकिता हत्येचा खटला उघडकीस येताच संपूर्ण उत्तराखंडमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. ज्यानंतर संतप्त जमावाने पुलकित आर्य याच्या रिसॉर्टला आग लावली होती. स्थानिक भाजप आमदार रेणू बिष्ट यांच्या गाडीच्या काचाही

पान १ वरून पुढे...

फोडण्यात आल्या होत्या. या प्रकरणाचे गांभीर्य आणि वाढता गोंधळ पाहून मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी अंकिता हत्या प्रकरणासाठी एसआयटी स्थापन केलेली. तसेच पुलकितचे रिसॉर्ट बुलडोझरने पाडून टाकण्यात आले होते. पुलकितच्या वडिलांची पक्षातून हकालपट्टी– या हत्येवरून संपूर्ण उत्तराखंड राज्यात संताप निर्माण झाला होता. त्यानंतर भाजपने पुलकितचे वडील विनोद आर्य यांची पक्षातून हकालपट्टी केलेली. विनोद आर्य हे भाजप नेते होते आणि त्यांनी उत्तराखंड सरकारमध्ये मंत्रिपद भूषवलं होतं. आर्य हे भारतीय जनता पक्षाच्या (BJP) ओबीसी मोर्चाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य होते आणि उत्तर प्रदेशच्या सह–प्रभारीची जबाबदारीही सांभाळत होते. पुलकितचा भाऊ अंकित आर्य यांना उत्तराखंड ओबीसी कल्याण आयोगाच्या उपाध्यक्ष पदावरून काढून टाकण्यात आले. त्यांना राज्यमंत्रिपदाचा दर्जा होता.

## शिखर शिंगणापूरला...

अभिषेक घालण्यासाठी शुक्रवारी मध्यरात्री कुटुंबीय गावातून स्वतःच्या चार वाहनांतून (एमएच. २४– एयू. ५३८१) जात होते. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास टेम्पो तुळजापूर–लातूर रस्त्यावर वडगाव लाख गावानजीक आला असता, पुलाच्या संरक्षक कठड्यावर आदळला.

दरम्यान, गाडीतील आरडाओरड, नातेवाइकांच्या आक्रोशमुळे रस्त्याने जात असलेल्या ट्रकचालकाने गाडी थांबवून बेशुद्ध अवस्थेतील पाच वर्षांचा अवधूत अमोल गीर या चिमुकल्यासह नरुत्तम प्रेम गीर (वय ६३) यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, तपासणीअंती डॉक्टरांनी अवधूत गीर याला मृत घोषित केले, तर नरुत्तम गीर यांच्यावर उपचार सुरू केले, तर गंभीर जखमी अमोल नरुत्तम गीर (वय ३०), दुर्गा अमोल गीर (वय २४), वैष्णव हनुमंत पुरी (वय २५), गीतांजली अजिंक्य गिरी, जयश्री नरुत्तम गीर (वय ५३) यांना १०८ रुग्णवाहिकेतून तत्काळ घटनास्थळावरून जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असतानाच आजी जयश्री निरुत्तम गीर यांचा मृत्यू झाला. या अपघाताच्या घटनेमुळे गीर कुटुंबीयावर दुःखाचा डोंगर कोसळला. जयश्री गीर या आहेत जिल्हा परिषद शिक्षिका..देव दर्शनासाठी निघालेल्या जयश्री गीर या अपघातात गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली. त्या लोहारा तालुक्यातील माकणी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेवर सहशिक्षिका पदावर कार्यरत होत्या. जखमींवर सुरू आहेत धाराशिव येथे उपचार अपघातात दुर्गा गीर यांच्या पोटचा गोळा मृत झाला आहे, तर गीतांजली गीर यांची जन्म दिलेल्या आई जयश्री यांचा ही मृत्यू झाला. जखमी झालेल्या दुर्गा गीर, वैष्णव पुरी आणि गीतांजली गिरी यांच्यावर धाराशिव जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर अमोल गीर आणि निरुत्तम गीर हे डिस्चार्ज घेऊन अंत्यविधीसाठी गावाकडे गेले आहेत.

## आगामी दीपावलीचा....

घरकूल लाभार्थ्यांच्या स्वतःच्या घरात लागावा असा मानस आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला. आष्टी येथील भैरवनाथ मंगल कार्यालयात आयोजित ग्रामविकास व पंचायत राज विभाग जिल्हा परिषद बीड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड यांच्यावतीने येणारी दिवाळी नवीन घरकूलात या अभियानांतर्गत.. आष्टी, पाटोदा, शिरूर

पान १ वरून पुढे...

(कासार) या तीन ही तालुकास्तरीय कार्यशाळेत आमदार सुरेश धस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील, सहाय्यक संचालक डी.बी. क्षीरसागर,आष्टी गटविकास अधिकारी जी. व्ही.बागलाने,पाटोदा गटविकास अधिकारी वानखेडे,नलावडे, सभापती बद्रीनाथ जगताप,जेष्ठ नेते भाऊसाहेब भवर, विनायक जंजिरे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार धस म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांची ही अतिशय महत्त्वाची घरकुलाची योजना आहे. आपल्या मतदारसंघात जे अपूर्ण कामे आहेत ते लवकर लवकर पूर्ण करावेत. ग्रामरोजगार सेवकांनी सार्वजनिक व वैयक्तिक लाभाच्या लाभार्थ्यांची पिळवणूक थांबवावी असे सक्त आदेश देऊन अधिकारी व ग्रामसेवक यांनी या घरकुल योजनेत होणाऱ्या पुरवणुकीत लक्ष देऊन स्वतः जबाबदारीने काम करावे यशवंत चव्हाण घरकुल योजनेत मतदार संघात २८ हजार घरकुले मंजूर आहेत. यामध्ये अनियमितता दिसून येत असल्याने बोगस मंजूर झालेल्या घरकुलाची चौकशी लावून पारदर्शकता आणू या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना माहिती देणार आहे. नवीन घरकुलाच्या सर्व्हेमध्ये देखील कोणताच लाभार्थी वंचित ठेऊ नका.नवीन मंजूर असलेले प्रशासनाच्या माध्यमातून आपण सर्व घरकुले पुर्णत्वास घेऊन जाऊ. सर्वसामान्य हा घरकुलाचा लाभार्थी असतो त्यासोबत कंत्राटी कर्मचारी यांच्या वागणुकी बरोबर नाहीत. त्यांनी त्या येणाऱ्या काळात सुधाराव्यात अन्यथा मी वेगळा निर्णय कंत्राटी कर्मचाऱ्याबाबत घेईल असा इशारा दिला मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने साहेब यांचे देखील मी कौतुक करतो की त्यांनी पदभार स्वीकारताच प्रलंबित असलेले दहा हजार घरकुले मार्गी लावले. येणाऱ्या दिवाळीपर्यंत आपल्याला सर्वांना मिळून माझी माय माऊली नवीन घरकुलात आणायची आहे हे ध्येय ठेवून काम करायचे आहे. असे सांगत वैयक्तिक लाभांच्या योजनांचे हजेरी पत्रक तात्काळ भरावे आहे असे शेवटी सांगितले.

## सतरंजीने हायपाय...

लावल्यानंतर आता केज तालुक्यातील विडा येथे अवादा पवनचक्की कंपनीच्या वॉचमनला मारहाण करणाऱ्या टोळीवर देखील मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.बीड पोलिसांनी येथील वॉचमला मारहाण करत चोरी टकरणाऱ्या टोळीवर मोक्काअंतर्गत कारवाई केली आहे. ७ एप्रिल रोजी वॉचमन अभिजीत दुनघव या वॉचमनला सतरंजीने हात पाय बांधत रोटर केबल, स्टार्टन केबल, अर्थिंग केबल असे एकूण १२ लाख ८७ हजार रुपयांच्या साहित्याची चोरी केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आता या प्रकरणातील आरोपी बबन सरदार शिंदे, धनाजी रावजी काळे, मोहन हरी काळे, लालासाहेब सखाराम पवार असे ४ आरोपी पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांना न्यायालयासमोर हजर केले होते. तसेच या गुन्ह्यात इतर ६ आरोपी निष्पन्न झाले असून ते अद्याप फरार आहेत, पोलीस त्यांचा शोध घेत आहे. या सर्व आरोपींच्या विरोधात बीड व धाराशिव जिल्ह्यात संघटित रित्या केज, नेकनूर, ढोकी, वाशी या पोलीस ठाण्याच्या हद्दीत ११ गुन्हे केल्याचे समोर आले आहे. त्यामध्ये दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, गंभीर दुखापत यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे, आता या टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

पान ४ वरून पुढे...

## लढलो नाही...

लोकलढा महत्वाचा असल्याचेही ते म्हणाले. आपण लढलो नाहीत, त्यामुळे आतापर्यंत धरणाचे पाणी आपल्याला मिळाले नाही, यामुळे पिढ्यांचा विकास खुंटला आता आपण एकत्र येत लढणे गरजेचे आहे, आपण लढलो नाही तर पिढ्या वाया जातील, त्यामुळे एकत्र येत लोकलढा तीव्र करू, आपण कायम शेतकर्यांसोबत असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## तीन वर्षांहून...

असलेल्या कर्मचाऱ्यांचे बदल्या करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार, पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर, पाटोदा तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती, स्थानिक लोकप्रतिनिधी व सामान्य नागरिक प्रशासनाकडे सतत मागणी करत आहेत की, दीर्घकाळ कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमुळे नवीन कर्मचाऱ्यांचे आगमन होऊन कार्यात पारदर्शकता व गती येईल.जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद सीईओ हे बदल्यां विषयी कोणता निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, नागरिकांना लवकरच सकारात्मक हालचाली अपेक्षित आहेत.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी...

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष जेष्ठ नेते शिवाजीराव फड, मार्गदर्शक चंद्रकांत शिवाजीराव फड हे होते तर अतिथी म्हणून रिपाइंचे नेते सुभाष भाऊ तांगडे,केंद्रे सर,हरीष खाडे,संजय काळे,अशोक वैद्य,शामराव राऊत,बांडे ज्ञानेश्वर काका,बाळासाहेब डोळस,हे होते.सोबतच मोफत दंतरोग तपासणी शिबिराचे मुख्य समन्वयक डॉ मंगेश अंधारे हे होते.शिबीराच्या आरंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.नंतर आश्रमाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार समारंभ संपन्न झाला यावेळी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले उद्घाटन समारंभानंतर लगेच दंतरोग तपासणी शिबिर सुरू झाले सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपाचे चंद्रकांत फड यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा.आजिनाथ शेरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे वृद्धाश्रम घाटसावळीचे नितिन फड यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संतोष खौतड, बारीक कडेकर, संजय फड, रामनाथ मुळे,सहदेव फड, गोरख फड , वर्षा शेरकर,उषा क्षीरसागर आदिंनी परीश्रम घेतले.

## साक्षाळपिंप्रीच्या...

गोरगरिबांच्या, विद्यार्थ्यांच्या अडीअडचणीच्या वेळेवर निपटारा व्हावा यासाठी प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचे आयोजन करण्याची शासनाचे निर्देश आहेत . त्यानुसार आज दिनांक ३० मे २०२५ रोजी साक्षाळ पिंपरी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिराच्या कार्यक्रमास बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर हे उपस्थित होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी कार्यक्रमाप्रसंगी बोलताना सांगितले की फार्मर आयडी काय आहे , त्याचे महत्त्व काय आहे , आपण तो कशासाठी काढायला पाहिजे . प्रत्येक व्यक्तीला जसे आधार कार्ड आहे , त्याचप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्याला शेतकरी

पान ४ वरून पुढे...

असल्याबाबत एक विशिष्ट ओळख क्रमांक देऊन त्या शेतकरी कार्डवर सर्व शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांना तात्काळ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी कार्ड काढाव. पुढे बोलताना जिल्हाधिकारी यांनी गावकऱ्यांचे कौतुक करत असा एकोपा कुठे दिसत नाही , असे नमूद केले . पुढे बोलताना त्यांनी खंत व्यक्त केली की बीड जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण खूप आहे , तसेच शेतकरी आत्महत्या मोठया प्रमाणात होतात . ही बाब निश्चितच योग्य नाही . साक्षाळपिंपरी गावात असं होऊ नये असा निर्धार गावकऱ्यांनी करावा , असे म्हटले . त्याला तात्काळ हो म्हणत गावाकऱ्यांनी शपथ घेतली . यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते विविध प्रमाणपत्राचे वाटप केले . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी सांगितले की सध्या जिल्हाधिकारी कार्यालयात जनता दरबार घेण्यात येतो . यानंतर तहसील स्तरावर सोमवारी व गुरुवारी जनता दरबार घेण्यात येणार आहे . सदर लोकअदालती मध्ये शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडविण्यात येतील . तसेच त्यांनी गावागावात विविध शिबिरे घेऊन गावातच लोकांना त्यांची कामे पूर्ण करून द्यावी , असे आवाहन केले . शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी करणे बाबत मार्गदर्शन केले . तसेच शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवाहन केले . शेतकऱ्यांचे प्रश्न गाव पातळीवरच मिटवून त्यांना न्याय देण्यात यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले . उपविभागीय अधिकारी कविता जाधव बोलताना म्हटल्या की गावातील घरकुल बांधकाम करण्यासाठी पाच ब्रास वाळू देण्यात येणार आहे . तसेच विविध योजनांची माहिती दिली व विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढे येण्याबाबत आवाहन केले . प्रास्ताविक बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले . छत्रपती शिवाजी महाराज अभियान कार्यक्रमाबद्दल प्रास्ताविक करून गावातील शेतकऱ्यांनी सदर अभियानात काळात देण्यात येणाऱ्या विविध दाखल्याबाबतची माहिती दिली . यात जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत गावातील शेतकऱ्यांचे वारस तपास करून त्यांना सातबारा , गावनमुना आठ , फेरफार देण्यात येणार आहे व गावातील शेतकऱ्यांना कुणबी दाखले , उत्पन्नाचे दाखले , ई शिधापत्रिका तसेच संजय गांधी श्रावण बाळ योजनेचे मंजुरी आदेश व ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत शासकीय विहिरी मंजुरी आदेश शेतकऱ्यांना वाटप करण्यात येतील व स्वच्छता मिशन अंतर्गत झाडू व बकेट वाटप करण्यात येईल असे नमूद केले . गावातील सर्व शेतकऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज अभियानात भाग घेऊन आपापली कामे पूर्ण करून घ्यावीत असे आवाहन केले . तसेच हे अभियान हे प्रत्येक महसूल मंडळाच्या ठिकाणी घेण्यात येणार असून प्रत्येक ठिकाणी एका वर्षात चार वेळेस घेण्यात येणार आहे , असे नमूद केले . याचा ग्रामीण भागातील शेतकरी तसेच इतर नागरिकांना जलद सेवा पुरवण्यासाठी फायदा होणार आहे . यामुळे महसूल प्रशासन अधिक पारदर्शी , जबाबदार , गतिमान व उत्तरदायी या भूमिकेतून जनतेसमोर जाणार आहे असे तहसीलदार यांनी सांगितले. या कार्यक्रमाप्रसंगी गावातील सुमारे शंभर खातेदार , लाभार्थी यांना सातबारा , गावनमुना आठ , फेरफार , कुणबी दाखले व संजय गांधी श्रावणबाळ योजनेचे मंजुरी आदेश , शिधापत्रिका वाटप करण्यात आल्या .सदर कार्यक्रमास मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ , शीतल चाटे , मंडळ अधिकारी प्रभू येवले , मंडळ अधिकारी महादेव जायभाये , मंडळ अधिकारी अंगद काशीद , ग्राम महसूल अधिकारी यशवंत सानप , पारगाव शिरस मंडळातील , राजुरी मंडळातील , चऱ्हाटा मंडळातील , पेंडगाव मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते . यावेळी गावातील सरपंच सौरभ नलावडे , बहादरपूर चे सरपंच दत्तात्रय कोळेकर , पोंडुळ गावचे सरपंच सानप , उपसरपंच पार्वती काशीद , अंकुश काशीद , मंगलबाई काशीद , रेखा काशीद , शहादेव सदाफुले , आदिनाथ शिरसागर , सविता पवार , गोरक्षनाथ चिंतामणी , अफसर शेख विठ्ठल काशीद व गावातील सुमारे

पान ४ वरून पुढे...

सहाशे शेतकरी उपस्थित होते .

## धरणे आणि...

उपयोग नाही. प्रत्येक नागरिकाने स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची काळजी घेतली पाहिजे.जीवन हेच सर्वात मोठं सेल्फी आहे, त्याला सुरक्षित ठेवा, हा संदेश देत अॅड. अजित देशमुख यांनी नागरिकांना आवाहन केलं की, पर्यटनाचा आनंद घ्या, पण जबाबदारीने आणि सुरक्षिततेच्या सर्व नियमांचं पालन करा. प्रशासनाने देखील कठोर कारवाई करावी, असे आवाहन देशमुख यांनी केले आहे.

## प्रमाणित बियाणांसाठी...

बदलाचे महत्व विचारात घेता सुधारित / संकरीत वाणांचे प्रसाराच्या दृष्टीने प्रमाणित बियाणे वितरण व पीक प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या घटकांतर्गत आर्थिक सहाय्य प्रति शेतकरी किमान ०.२० हे ते कमाल १ हेक्टरपर्यंत मर्यादित आहे. प्रमाणित बियाणे वितरण या घटकाचा लाभ वैयक्तिक शेतक–यांना देण्यात येणार असून सोयाबीन, भुईमुग, सुर्यफुल व तीळ या पिकांकरिता १०० टक्के अनुदानावर बियाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याकरिता https:// mahadbt. maharashtra.gov.in/FarmergriLogin/griLogin या संकेतस्थळावर बियाणे वितरण, प्रात्यक्षिक,फ्लेक्सी घटक, औषधे आणि खते या टाईल अंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येतील. या घटकाची प्रथम लाभार्थी निवड यादी दि.३० मे २०२५ रोजी जाहीर करण्यात येईल. तसेच भात, तुर, मुग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, वरई या पिकांकरिता अनुदानावर प्रमाणित बियाणे उपलब्ध आहे. शेतक–यांनी ७/१२ उता–यासह कोणतेही एक ओळखपत्र बियाणे वितरकाला दाखवून अनुदान वजा जाता लोकवाटा भरुन प्रमाणित बियाणाचा लाभ घ्यावा. प्रमाणित बियाणे घटकास अर्ज सादर करणेसाठी शेतक–यांची सीळींरलज्ञ वर नोंदणी असणे बंधनकारक आहे. लाभार्थी निवड प्रथम अर्ज करणा–यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्वावर करण्यात येणार आहे. प्रमाणित बियाणे वितरण या घटकाचा लाभ घेणेसाठी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी प्रमाणित बियाणे वितरण या घटकाचा लाभ घ्यावा असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी जवळच्या कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

## भारतीय सैनिकांच्या...

केद्रिय मंत्री रामदास आठवले यांच्या.आदेशानुसार शुक्रवार दि.३० मे रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून साहीत्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत भारत झिंदाबाद तिरंगा मोटार सायकल रॅली काढण्यात आली. या भारत झिंदाबाद रॅलीची सांगता राष्ट्र गीताने झाली. भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या भारत झिंदाबाद तिरंगा रॅलीत महीला, रिपाइं पदाधिकारी व कार्यकर्ते हजारोच्या संखेने सामील झाले होते. बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यापासून काढण्यात आलेल्या भारत झिंदाबाद तिरंगा रॅलीत रिपाइं जेष्ट नेते कांतीकुमार जैन, राजू जोगदंड, मझरखान, अशोक साळवे, किसन तांगडे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, दीपक कांबळे, महादेव उजगरे, अरुण भालेराव, धोंडीराम सिरसट, लक्ष्मण सिरसट, अरुण निकाळजे, दशरथ

पान ४ वरून पुढे...

सोनवणे, दिपक कांबळे, गोवर्धन वाघमारे, शाहू डोळस, दशरथ शिंदे, रवी जोगदंड, महेश आठवले, प्रमोद दासूद, संदिपान डोंगरे, दिलीप बनसोडे, गौतम बचुटे, अड. सुरेश वडमारे, मायाताई मिसळे, सलमाभाभी, संगीता जाधव, माया वाघमारे, राणी गायकवाड, शोभा गलांडे, राहुल सरवदे, रमेश निशिगंध, निलेश ढोबळे, विलास वाघमारे, मिलिंद तरकसे, आनंद ओगले,बाबा देशमाने, बाळासाहेब ओव्हाळ, अविनाश जोगदंड, विलास जोगदंड, प्रभाकर चांदणे, सुभाष तांगडे ,भैय्या मस्के, शाम वीर, आप्पा मिसळे, प्रा.बाळासाहेब गव्हाणे, अक्षय कोकाटे, नागेश दुबळे, चिंटू वडमारे, गौरी वडमारे,अजिंक्य वडमारे,संजय कागदे, प्रभाकर जोगदंड, सतीश शिनगारे, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे,भैय्या साळवे, संजय हनवते, गौतम कांबळे, सोनू वडमारे, धम्मा पारवेकर, महेश कागदे, अविनाश अवघड, प्रशांत मोरे, नागेश शिंदे, देवानंद वाघमारे, रतन वाघमारे, भाऊसाहेब दळवी, भाऊसाहेब कांबळे, किरण खंडागळे, नवनाथ डोळस, भास्कर जावळे, राहुल कांबळे, नामदेव वाघमारे,रामेश्वर खळगे, सिध्दार्थ वाघमारे, देवानंद वाघमारे, विशाल पवार, दयानंद उबाळे, फुलचंद लुचारे, बंडू ठोंबरे, भीमराव घोडेराव यांच्यासह हजारो रिपाइं कार्यकर्ते भारत झिंदाबाद तिरंगा रॅलीत सहभागी झाले होते.

## आ.संदीप क्षीरसागरांच्या...

आणि शेतकर्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. परंतु यासोबतच नदीकाठच्या नागरिकांनी पूरपरिस्थिती संदर्भात सतर्क राहून खबरदारी घेण्याचेही आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. दरम्यान आ.क्षीरसागर यांनी बिंदुसरा धरणाची सुरक्षेच्या दृष्टीने पाहणी केली. यावेळी महसूल विभाग, जलसंपदा विभाग, जायकवाडी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## 23 जुलै...

औरंगाबाद डॉ.निलम पाटील यांनी दि.२९ मे आणि दि.२८ जुन २०२३ अशा २ वेळा मुख्याधिकारी नगरपरिषद बीड निता अंधारे यांना बिंदुसरा नदीपात्रात भराव घालून नदीपात्राचे मैदान करून ओढे चक्क बुजवुन नदीचा प्रवाह वळवुन करण्यात आलेल्या अनाधिकृत बांधकाम प्रकरणी ठोस कारवाई करण्याचे आदेश देऊनही मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांनी आणि जिल्हा प्रशासनाने जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे भविष्यात जर बिंदुसरा नदीला आलेल्या पुरामुळे जिवितहानी अथवा वित्तहानी झाली तर याला सर्वस्वी नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हा प्रशासन जबाबदार असणार आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात फौजदारी कारवाई आणि नुकसान भरपाई जबाबदार अधिकाऱ्यांकडून घेण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि रामनाथ खोड यांनी केली आहे. १९८९ चा बिंदुसरा नदीला आलेला पुराचा मागील अनुभव पाहता नगरपरिषद प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि पाटबंधारे विभाग यांना वारंवार पुर नियंत्रण रेषा ( निल रेषा,लाल रेषा) आखणी करण्यात यावी. संरक्षक भिंतीचा अभाव, नदीपात्रात व शेजारी अनेक अतिक्रमित ईमारतीची बांधकामे करण्यात आलेली आहेत.तर फुलाई नगर मधील बिंदुसरा नदीपात्रात सिमेंटची भिंत बांधून नदीचा प्रवाह वळविण्यात आलेला आहे आणि संबंधित प्रकरणात वारंवार तक्रारी व आंदोलनानंतर सुद्धा नगरपरिषद व जिल्हा प्रशासन आपापले स्वार्थ साधून भुमाफियांशी संधान बांधून आहेत त्यामुळे आज बीडकरांचा जीव टांगणीला लागलेला असल्याची उद्विग्न प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाच्या तालुका अध्यक्षांची घोषणा

गेवराई | बीड | परळी | केज | माजलगाव | धारूर | वडवणी | अंबाजोगाई | शिरूर | पाटोदा | आष्टी



आन्नासाहेब राठोड | राहुल (बाळु) गोरे | बाबासाहेब शिंदे | शंकर जाधव | विशांभर थावरे | युवराज लगड | महादेव जमाले | अमर देशमुख | दिपक खोले | आनंद (पिंटु) जाधव | सुनिल नाथ

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी बीड जिल्ह्यातील सर्व अकरा तालुका अध्यक्षांच्या नावांची घोषणा आज जाहीर केली. जिल्ह्याचे लोकप्रिय खा. बजरंग बाप्पा सोनवणे,आ. संदिप क्षीरसागर, माजी आमदार, जेष्ठ नेते मंडळी यांचेशी चर्चा करून निवडी करण्यात आल्या असल्याची माहिती जिल्हध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. राजेंद्र मस्के यांची जिल्हाध्यक्ष पदावर निवड झाल्यानंतर सर्व नेते पदाधिकारी कार्यकर्ते यांचेशी चर्चा करून राष्ट्रवादी भवन बीड येथे जिल्ह्याची व्यापक बैठक घेऊन जुनी कार्यकारिणी बरखास्तीची घोषणा केली होती. त्यानंतर जुन्या नव्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन तालुका निहाय बैठका घेण्यात आल्या. प्रत्येकांशी संवाद साधण्यत आला.तालुका अध्यक्ष कसा असावा कोण असावा याबाबत अनेकांचे मत विचारात घेण्यात आले. पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना सोबत घेऊन नवीन माणसं जोडणारा असावा. तालुक्यातील जनता व कार्यकर्त्यांना वेळ देणारा, सर्वांना सोबत घेऊन तालुकाभरात काम करणारा व्यक्तीची निवड करावी.अशी प्रतिक्रिया सामान्य कार्यकर्त्यां मधून आल्या नंतर पुढील तालुका अध्यक्ष नावांची निश्चिती करण्यात आली. राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार साहेब याचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्या साठी, सामान्य जनते सेवा आणि अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी सर्वाना सोबत घेऊन ताकदीने काम करावे. अशी अपेक्षा व्यक्त करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. नवनियुक्त तालुका अध्यक्षांची नावे पुढीलप्रमाणे- गेवराई- अण्णासाहेब राठोड, बीड -राहुल अर्जुनराव गोरे, परळी- बाबासाहेब शंकरराव शिंदे ,केज- शंकर जाधव, माजलगाव- विश्वंभर जनार्दन थावरे, धारूर -युवराज आनंदराव लगड , वडवणी - महादेवराव जमाले, अंबाजोगाई -अमर देशमुख , शिरूर- दिपक खोले , पाटोदा- आनंद जाधव, आष्टी- सुनील नाथ

# रुई लिंबा येथे 'छ.शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान' संपन्न

## भारतीय नागरिकत्वाचा पुरावा म्हणजे आधार आयडी तसेच शेतकरी असल्याचा पुरावा म्हणजे फार्मर आयडी : नायब तहसीलदार डोके

**बीड । प्रतिनिधी**

गुरुवार दि २९ मे रोजी मौजे रुई ( लिंबा ) येथे महाराष्ट्र शासनाच्या आदेशाने महसूल विभाग बीडचे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान यशस्वीरीत्या संपन्न झाले . सदर अभियानाचे उद्घाटन व प्रमुख मार्गदर्शन सुरेंद्र डोके नायब तहसीलदार बीड यांनी केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष दिनकर भोसकर , सरपंच होते . यावेळी प्रभू येवले (मंडळ अधिकारी, राजुरी (न.) , नवनाथ तांदळे ( तलाठी , मुर्शदपूर ) , संजय पाखरे ( तलाठी , राजुरी(न.) , बंडू आगलावे ( तलाठी , तळेगाव ) , उत्तरेश्वर खांडे ( तलाठी , बेलुरा ) , प्रवीण सानप ( तलाठी, वंजारवाडी ) , श्री गावडे , ( कृषीसहायक) श्री तळेकर , (कृषीसहायक) , अशोक सोळुंके उपसरपंच . इ. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते .



बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्ह्याचा पदभार घेतल्यापासून सर्वसामान्य जनतेची कामे करण्याचा विडा उचलला आहे . नव्यानेच रुजू झालेले अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांचे नेहमी सर्व महसूल अधिकारी यांना मार्गदर्शन असते . सर्वसामान्य शेतकऱ्यांची कामे वेळेवर झाली पाहिजे हा त्यांचा कटाक्ष असतो . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या सुद्धा सर्वसामान्य जनतेसाठी राबतांना दिसतात. महसूल विभागाअंतर्गत ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता - शेतकरी , विद्यार्थी व महिला यांचे विविध कामकाजाचे निराकरण करणे बाबत या शिबिराचा उद्देश आहे . यामध्ये जिवंत सातबारा मोहीम ( वारस फेरफार ) , सस्ती अदालत ( रस्ते खुले करणे ) , विविध दाखले वितरित करणे ( सेतू मार्फत ) , ग्रीस्टॅक ( फार्मर आयडी ) , पुरवठा विभागाची कामे , संजय गांधी - श्रावण बाळ योजना डी बी टी कामे , ई-फेरफार , ई-केवायसी , इत्यादी कामे ग्रामस्तरावर प्रश्न मार्गी लावणे / निकाली काढणेच्या दृष्टीने कामकाज करण्यात आले . यामध्ये प्रातिनिधिक स्वरुपात ११ जिवंत सातबारा ( वारस फेरफार ) , ८ जणांचे फार्मर आयडी , ५ जणांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र , १० जणांचे झङकार्ड , वाटप करण्यात आले . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक श्री खाकरे यांनी व आभारप्रदर्शन अशोक अप्पा सोळुंके यांनी केले. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना शेतकऱ्यांच्या कामाविषयी अतिशय कनवाळूपणा आहे . तहसील कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक सर्वसामान्य व्यक्तीचे कसे समाधान होईल , यासाठी त्यांचा प्रयत्न असतो . तहसील कार्यालयातील सर्व नायब तहसीलदार , अधिनस्त मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांनी जनतेत जाऊन कामे केली पाहिजे , सर्वसामान्य कोणत्याही व्यक्तीचे काम न झाल्यास सरळ माझ्याशी संपर्क साधावा , असे आवाहन त्यांनी यावेळी केले

मागील काही दिवसापासून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लोकोपयोगी अनेक निर्णय घेतले आहेत .याशिवाय विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सुद्धा सस्ती अदालत योजना विभागात चांगल्या प्रकारे राबविल्याचे दिसून येते . अशाच प्रकारे महसूल विभाग जनताभिमुख कामे करत राहिल्यास निश्चितच बळीराजा सुखी होईल यात शंका नाही.

# पाटोद्यात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त शोभायात्रेचे जल्लोषात स्वागत



**पाटोदा । प्रतिनिधी**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त मालेगाव (जि. नांदेड) येथून निघालेली शोभायात्रा आज पाटोदा तालुक्यात मोठ्या उत्साहात दाखल झाली. गावातील नागरिकांनी फुलांची उधळण,पिवळ्या ध्वज आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात शोभायात्रेचे जोरदार स्वागत केले. शोभायात्रा पाटोदा शहरात दाखल होताच गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. जयघोष, ढोल-ताशा, आणि श्रद्धेने ओतप्रोत कार्यक्रम यामुळे संपूर्ण परिसर उत्साहाने भारून गेला होता. गावकऱ्यांनी राजमातांना मनःपूर्वक अभिवादन करत इतिहासातील या तेजस्वी अधिष्ठानाचे स्मरण केले.ही यात्रा दरवर्षीप्रमाणे चौंडी, जिल्हा अहिल्यानगर येथे पोहोचणार आहे. चौंडी ही राजमातांची जन्मभूमी असून, त्या स्मृतिस्तंभावर दरवर्षी राज्यभरातून यात्रा येते. अहिल्यादेवींच्या कार्याचा जागर आणि त्यांच्या आदर्श शासनव्यवस्थेचा प्रसार हाच या यात्रेचा उद्देश आहे.यात्रेच्या स्वागतासाठी ग्रामस्थ, युवक आणि विविध सामाजिक कार्यकर्ते व नेत्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून अहिल्यादेवींच्या जीवनकार्याचा गौरव केला. राजमातांचा आदर्श समाजघडणीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे जीवन म्हणजे सेवा, न्याय आणि त्याग यांचे प्रतीक आहे.

# डिस्ट्रिक्ट कलेक्टर फेलो नियुक्ती बाबत निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२५-२६ योजनांअंतर्गत खर्चाची परिणमता, उपयोगिता तपासण्यासाठी वेळो वेळी योजनांचे मुल्यामाप, सनियंत्रण,माहितीचे संकलन, विश्लेषण व माहितीची अज्ञावलीचे अद्यावतीकरण करण्याची अत्यंत आवश्यकता असल्याने वरील बाबीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासाठी दोन (कंत्राटी) Diistrict Collector Feiiow पदाची नेमणूक करावयाची आहे.

यासाठी खालीलप्रमाणे दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी तत्वावर पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करावेत.

पात्रता- एम.ए,एम. एस.सी,एम.एस.डब्ल्यू,एम. टेक.,एम.बीए विकास क्षेत्र,एनजीओ,सीएसआर,आयटी डोमेन क्षेत्रात किमान २ वर्षांचा अनुभव, शक्यतो सरकारी सेटअपमध्ये.ब्लॉक आणि जिल्हा प्रशासनाची चांगली समज मायक्रोसॉफ्ट वर्ड, एक्सेल आणि पॉवरपॉइंटमध्ये प्रवीण सरकारी विभागांच्या रचनेची आणि कामकाजाची पूर्वीचा अनुभव/परिचितता विकास क्षेत्राची चांगली समज बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात राहण्याची आणि प्रवास करण्याची इच्छा. इंग्रजी आणि मराठी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे.

प्रमुख जबाबदाऱ्या- जिल्ह्यातील ओळखल्या जाणाऱ्या आव्हानांना किंवा संधींना तोंड देण्यासाठी धोरणे, कृती योजना आणि शिफारसी विकसित करा आणि अंमलात आणा. राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांच्या ठिकाणांचे निरीक्षण आणि क्षेत्रीय भेटी योजनांचे विश्लेषण आणि अंमलबजावणीमध्ये जिल्हा प्रशासनाला मदत करणे.सादरीकरणे, अहवाल आणि इतर संप्रेषण साहित्य तयार करा आणि वितरित करा. आयटी प्रणालींच्या सुरळीत कामकाजात जिल्हा प्रशासनाला सहकार्य करणे.जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियुक्त केलेली इतर कर्तव्ये जिल्ह्यातील विविध विभाग, सीएसआर आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये समन्वय आणि संपर्क सुलभ करणे.

ही पदे भरण्यासाठी https://beed.gov.in/ या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून शैक्षणिक अर्हता व अर्ज करावयाच्या पध्दतीमध्ये इच्छुक उमेदवारांनी आपला ऑनलाईन अर्ज https://docs.qie.com/forms/ व/1FipqLSfqFcUwcMjloTYMoiEftw6jpc80ecekH14DL5s9fqfsyoL1q/viewform

या लींकवर भरावा सदरील पदासाठी अर्ज स्विकारण्याचा अंतिम दि. १० जून २०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकृत करण्यात येणार नाहीत किंवा विचारात घेतले जाणार नाहीत. अर्ज सादर करतांना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास career.dcbeed@gmail.com या मेलवर करावा.

## कौशल्याबाई फड यांचे निधन

**परळी । प्रतिनिधी**



परळी पंचायत समिती व बाजार समितीचे माजी सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते व धर्मापुरीचे सरपंच ॲड. गोविंद विनायकराव फड यांच्या मातोश्री कौशल्याबाई फड यांचे शुक्रवारी (दि. ३०) रात्री सव्वाबारा वाजेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. स्व. कौशल्याबाई फड यांच्या पार्थिवावर धर्मापुरी येथे शुक्रवारी सकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजर राहून श्रद्धांजली वाहिली. स्व. कौशल्याबाई फड यांच्या पश्चात मुले ॲड. गोविंद फड व बालाजी फड, तीन मुली, सुना, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. अत्यंत मनमिळावू व धार्मिक वृत्तीचा स्वभाव असलेल्या कौशल्याबाई फड यांच्या निधनामुळे हळहळ व्यक्त होत आहे.

# परळी तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी जाहीर

## सिरसाळा शहर प्रमुख पदी रुपेश गायकवाड तर तालुका संघटक पदी अनिल शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशाने शिवसेना उपनेते अर्जुन भाऊ खोतकर व शिवसेना सचिव संजय मोरे साहेब यांच्या सूचनेवरून संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या संमतीने परळी तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आल्या. यामध्ये सिरसाळा शहरप्रमुखपदी रुपेश गायकवाड तर तालुका संघटक पदी अनिल शिंदे यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे यांनी स्वागत करुन शुभेच्छा दिल्या.

नूतन कार्यकारिणीमध्ये अनिल शिंदे (तालुका संघटक), मोहन राजमाने (उपशहरप्रमुख परळी), उमेश सोळंके (उपतालुकाप्रमुख), शिरसाळा जि.प.गट), शरद सोनवणे (उपतालुकाप्रमुख) पिंप्री (बु) (जि.प.गट), नागेश मुरकुटे(उपतालुकाप्रमुख) वडगाव (दा.) (जि.प.गट), एकनाथ गुट्टे (उपतालुकाप्रमुख) धर्मापुरी (जि.प.गट), गजानन सोळंके (उपतालुकाप्रमुख) नागापूर (जि.प.गट), कैलास कावरे (सर्कलप्रमुख) सिरसाळा (पंचायत समिती), बळीराम काकडे (सर्कलप्रमुख) पोहनेर (पंचायत समिती), सुदाम शिंदे (सर्कलप्रमुख), वडगाव (दा) (पंचायत समिती), सचिन गोरे (सर्कलप्रमुख) नागापूर (पंचायत समिती), विशाल शिंदे (सर्कलप्रमुख) पांगरी (पंचायत समिती), मुंजा गायकवाड (सर्कलप्रमुख) नंदागौळ (पंचायत समिती), सुंदर रवळे (जि.प. उपसर्कलप्रमुख) शिरसाळा (पंचायत समिती),दत्ता सोनवणे (पं.स. उपसर्कलप्रमुख) यांची निवड करण्यात आली. संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे ,जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक व उपजिल्हाप्रमुख राजा पांडे, तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## गंगाबाई देशमुख यांचे निधन



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील नाहोली येथील ज्येष्ठ महिला गंगाबाई भानुदास देशमुख वय ९१ वर्ष यांचे वृद्धाप काळाने गुरुवार रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्यावर नाहोली येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावाई, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्या हनुमान विद्यालयातील सहशिक्षक जालिंदर देशमुख यांच्या मातोश्री होत.

# डॉ. गिलबिले, डॉ. मस्के यांना कर्मवीर एकनाथराव आव्हाड पुरस्कार प्रदान

**माजलगाव । प्रतिनिधी**

मानवी हक्क अभियानचे संस्थापक कर्मवीर ऑड. एकनाथ आवाड हे उपेक्षित वंचित बहुजन समाजाच्या विकासासाठी आयुष्यभर लढले. उपेक्षित वंचित समाजातील लोकांना बोलायला आणि लढायला त्यांनी शिकवले असल्याचे मत बहुजन विकास मोचार्चे संस्थापक बाबुराव पोटभरे यांनी व्यक्त केले.



कर्मवीर ऑड एकनाथराव आवाड यांच्या १० व्या स्मृती दिन कार्यक्रमाच्या निमित्तानं ते बोलत होते. दरम्यान स्मृतिदिनानिमित्त वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले वडॉ. दिनकर मस्के यांना कर्मवीर एकनाथराव आवाड पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.. प्रकाशराव आनंदगावकर होते तर उद्घाटक म्हणून मोहनराव जगताप प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मिलिंद आव्हाड उपस्थित होते मंचावर दादासाहेब क्षिरसागर, दादासाहेब मुंडे, श्रीमती. गयाबाई आवाड, सत्यभामा सौंदरमल सह आदी उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १६/२०२५**

**विकास पि. शहादेव लांडे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय बेलापुरी**

पहा

**१ - विकास पि. शहादेव लांडे, रा. बेलापुरी ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **विकास पि. शहादेव लांडे** यांचा दिनांक २२/०७/२००४ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहून अर्जदार यास जन्माची नोंद ग्राम पंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास बेलापुरी ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. बीड बेलापुरी ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०५/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०६/२०२५ ही आहे.

शिक्का

(स्वाक्षरीत)
तहसिलदार
बीड

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १६/२०२५**

**विशाल पि. शहादेव लांडे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय बेलापुरी**

पहा

**१ - विशाल पि. शहादेव लांडे, रा. बेलापुरी ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **विशाल पि. शहादेव लांडे** यांचा दिनांक ०३/०५/२००२ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहून अर्जदार यास जन्माची नोंद ग्राम पंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास बेलापुरी ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. बीड बेलापुरी ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०५/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०६/२०२५ ही आहे.

शिक्का

(स्वाक्षरीत)
तहसिलदार
बीड

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १५/२०२५**

**पुनम पि. शहादेव लांडे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय बेलापुरी**

पहा

**१ -पुनम पि. शहादेव लांडे, रा. बेलापुरी ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **पुनम पि. शहादेव लांडे** यांचा दिनांक ०७/११/२००० रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहून अर्जदार यास जन्माची नोंद ग्राम पंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास बेलापुरी ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. बीड बेलापुरी ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०५/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०६/२०२५ ही आहे.

शिक्का

(स्वाक्षरीत)
तहसिलदार
बीड

CMYK

दैनिक मराठवाडा पत्र

epaper.marathwadapatra.com

शनिवार, दि.३१ मे २०२५ पान ४

## आर.टी.जिजा देशमुख यांच्या निधनामुळे वाढ दिवस साजरा करणार नाही : प्रा.ईश्वर मुंडे

किल्ले धारूर । प्रतिनिधी



सध्या रस्ते आपघातात मृत्यूचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे ही खूप दुःखाची बाब आहे. त्यात नुकतेच बीड जिल्ह्यातील लोकप्रिय माजी आमदार आर.टी.जिजा देशमुख यांचे औसा-तुळजापूर रोडवर आपघातात आर.टी.जिजा देशमुख हे कोणत्या पक्षाचे आहेत हे महत्वाचे नसून ते आपल्या नेतृत्वाला प्रमाणीक,सदैव हस्यवदनी,अजातशत्रू व विरोधकांनाही प्रेमाणे वागवणारे जेष्ठ मार्गदर्शक नेते होते.जिजांच्या अकाली निधनामुळे आमच्यासह सर्वच स्तरातील जनता ▶▶ उर्वरित पान २ वर

# लढलो नाही तर पिढी वाया जाईल : पवार
# माजी मंत्री पंडित, तहसीलदार यांनी घेतली भेट

बीड । प्रतिनिधी

वर्षानुवर्षे आपल्या शेतीला पाणी नाही, दुष्काळाने शेतकर्यांसमोर आर्थिक प्रश्न आहेत, आताही आपण शेती पाण्यासाठी लढलो नाही तर पुढील पिढ्याही दारीद्र्यात जातील, त्यामुळे आता शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासाठी मोठा लढा दिला पाहिजे, असे प्रतिपादन बाळराजे पवार यांनी तांदळा येथे केले. शुक्रवारी त्यांनी तांदळा येथे भेट देत उपोषणकर्ते अजय पाटील साळुंके यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित, तहसीलदार संदिप खोमाने यांनीही भेट दिली.

जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाच्या या दुसर्या टप्प्यात तांदळा येथे अजय पाटील साळुंके यांनी २५ मे पासून उपोषण सुरू केले आहे. गेल्या सहा दिवसात त्यांनी अन्नपाणी त्याग केल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. अशक्तपणा येऊन किडनीलाही त्रास होत




### ● मुख्यमंत्र्यांची भेट घेऊ- पंडित

तांदळा येथे उपोषणकर्त्यांशी बोलताना माजी मंत्री बदामराव पंडित म्हणाले, की जायकवाडी धरणाचे पाणी मिळणे गरजेचे आहे. यासाठी आपण पुढाकार घेऊन उपोषणकर्त्यांचे शिष्टमंडळासह जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन मागण्यांसंदर्भात त्यांच्याशी चर्चा करू.

### ● १४० गावातील शेतकरी उपोषण करतील-गुळवे

गेल्या सहा दिवसांपासून तांदळा येथे सुरू असलेल्या उपोषणाची दखल शासन व प्रशासन पाहिजे तशी घेत नाही. त्यामुळे अजय पाटील यांची प्रकृती खालावली आहे. शासनानी याची योग्य दाल न घेतल्यास १४० गावातील शेतकरी तांदळा येथे उपोषणास बसतील असा इशारा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे यांनी दिला.

आहे. त्यांच्या या प्रकृतीची माहिती मिळताच शुक्रवारी बाळराजे पवार यांनी तांदळा येथे भेट देऊन अजय पाटील साळुंके यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी बोलताना बाळराजे पवार म्हणाले, की आपल्या भागातील शेती जायकवाडीच्या पाण्यापासून वंचित आहे, त्यामुळे शेतकरी अडचणीत असून त्यांच्यासमोर अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी आपल्याला नदीजोड प्रकल्प होणे आवश्यक आहे, या योजना होण्यासाठी हा ▶▶ उर्वरित पान २ वर

# तीन वर्षांहून अधिक काळ पाटोद्यात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या कधी होणार ?

## पाटोदा तालुक्यातील जनतेचे जिल्हा प्रशासनाकडे लक्ष

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील महसूल आणि जिल्हा परिषद विभागातील अनेक कर्मचारी मागील तीन ते पाच वर्षांहून अधिक कालावधीपासून पाटोदा येथेच कार्यरत आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या बदल्या केव्हा होतील याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.नुकतेच बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी पोलीस विभागातील काही गंभीर निर्णय घेऊन धडाकेबाज कारवाई करत कार्यक्षमता सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या निर्णयाचे जिल्हात सर्वत्र कौतुक होत असून,आता नागरिकांचे लक्ष आहे ते बीड जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे.राज्य शासनाने १८ जून २०२४ रोजी जारी केलेल्या नवीन बदल्यांच्या धोरणानुसार,अवघड व अतिदुर्गम क्षेत्रात तीन वर्षांपेक्षा अधिक काळ कार्यरत ▶▶ उर्वरित पान २ वर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या औचित्याने...

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब वृद्ध आश्रम घाटसावळी येथे दंत चिकित्सा रोग निदान शिबीर संपन्न

बीड । प्रतिनिधी

दि.३१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त भारतीय जनता पार्टी बीड च्या वतीने जिल्हाभरात सामाजिक उपक्रम सप्ताह सुरू आहे.सप्ताह अंतर्गत विविध समाजोपयोगी सामाजिक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. या पैकी एक दिनांक ३० शुक्रवार रोजी आदित्य डेंटल कॉलेज व लोकनेते



स्व.गोपिनाथराव मुंडे वृद्धाश्रम घाटसावळी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत दंतरोग तपासणी शिबिर नुकतेच संपन्न झाले.शिबीरात पंचक्रोशीतील ग्रामस्थ नागरिक व अबाल वृध्द व्यक्ती यांनी या मोफत शिबीराचा लाभ घेतला.

▶▶ उर्वरित पान २ वर

## साक्षाळपिंप्रीच्या नागरिकांनी घेतली बालविवाह न करण्याची शपथ

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासमोर केला शेतकरी आत्महत्या होऊ न देण्याचा निर्धार

बीड । प्रतिनिधी

साक्षाळपिंप्री येथे शुक्रवारी (३० मे) छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिराचे आयोजन महसूल व वन विभागाच्या व ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आले होते . ग्रामीण भागातील नागरिकांची कामे जलद गतीने व्हावीत , महसूल विभाग हा शासनाचा महत्त्वाचा विभाग असून शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी तसेच



शेतकऱ्यांशी संबंधित असणारे जिव्हाळ्याचे प्रश्न तातडीने मार्गी लागावीत यासाठी कॅम्पचे आयोजन करण्यात आले . तसेच या भागातील शेतकऱ्यांच्या, ▶▶ उर्वरित पान २ वर

## धरणे आणि कठडे ही फोटोंची ठिकाणं नाहीत; मुलांकडे लक्ष द्या!- ॲड. अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी

पावसाळा सुरू होताच जिल्यातील धरणे, तलाव आणि नद्या पर्यटकांसाठी आकर्षण ठरतात. मात्र, या निसर्गरम्य ठिकाणी जिवाशी खेळणे कितपत योग्य आहे, याचा विचार करणे अत्यावश्यक आहे. विशेषतः धरणे आणि त्यांच्या कठड्यावर जाणे, सेल्फी घेणे किंवा मुलांना तिथे मोकळे सोडणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. त्यामुळे जनतेने स्वतः आणि मुलांना यापासून वाचवावे, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी व्यक्त केले आहे.

आज काल सोशल मिडियाच्या क्रेझमुळे



लोक कुठेही फोटो किंवा व्हिडिओसाठी थांबतात. पण धरणांचे कठडे, जलप्रपात, पूल हे काही फोटोजाठी योग्य ठिकाणे नाहीत. हे ठिकाणं जीवन आणि मृत्यूच्या सीमारेषेवर असतात, असे सांगून देशमुख यांनी पालकांना आवाहन केले की, आपल्या मुलांकडे विशेष लक्ष द्या. क्षणभराची असावधता गंभीर दुर्घटना घडवू शकते. प्रशासनाची जबाबदारी आणि जनतेचा सहभाग - देशमुख यांनी प्रशासनालाही आवाहन केले की, अशा धोकादायक ठिकाणी सूचना फलक लावावेत, अडथळे तयार करावेत आणि गस्त वाढवावी. मात्र फक्त प्रशासनावर जबाबदारी टाकून ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रमाणित बियाणांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

खरीप २०२५ हंगामासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत भात, तुर, मुग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, वरई व कापूस तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया अंतर्गत - सोयाबीन, सुर्यफुल, भुईमुग, तीळ पिकांच्या अनुदानावरील प्रमाणित बियाणे करिता अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान- अन्नधान्य पिके व वाणिज्यिक पिके आणि राष्ट्रीय खाद्यतेल अभियान- तेलबिया अंतर्गत पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी व बियाणे

▶▶ उर्वरित पान २ वर

## भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी बीड शहरात रिपाइंची भारत झिंदाबाद तिरंगा रॅली



बीड । प्रतिनिधी

जम्मु काश्मीरमधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकावर दहशतवाऱ्यांनी भ्याड हल्ला करून अठावीस भारतीयांची हत्या केली होती. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय सैनिकांनी सिन्दुर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशत वाद्यांची ठिकाणे उध्दवस्त करुन शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैनिकांनी अतुलनिय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी सिन्दुर ऑपरेशन यशस्वी केल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने भारतीय सैनिकांच्या अभुतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

## आ.संदीप क्षीरसागरांच्या हस्ते बिंदुसरा धरणात जलपूजन

### ● बिंदुसरा प्रकल्प १०० टक्के क्षमतेने पूर्ण भरला

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पाली येथे असलेला बिंदुसरा धरण प्रकल्प मान्सुनपूर्व पावसानेच १०० टक्के क्षमतेने भरला असून आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.३०) रोजी बिंदुसरा धरणात जलपूजन करण्यात आले.



मागील काही दिवसांपासून होत असलेल्या सततच्या मान्सूनपूर्व पावसाने बीड शहराला लागून असलेल्या पाली येथील बिंदुसरा धरणात १०० टक्के पाणीसाठा झाला आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरले असून पाणी ओसंडून वाहत आहे. पावसाळ्यापूर्वीच धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्याने नागरिक ▶▶ उर्वरित पान २ वर

# 23 जुलै 1989 सारखी बीडमध्ये महापुराची दुर्घटना घडली तर नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासन जबाबदार

### ● विभागीय आयुक्तांनी २ वेळा मुख्याधिकारी याना बिंदुसरा नदीपात्रातील अतिक्रमण प्रकरणी ठोस कारवाईचे आदेश देऊनही जाणिवपूर्वक दुर्लक्ष : डॉ.गणेश ढवळे



बीड । प्रतिनिधी

यावर्षी मान्सुनपुर्व झालेल्या अतिवृष्टीमुळे बिंदुसरा धरण पुर्ण क्षमतेने भरून ओसंडून वाहू लागले आहे.येत्या पावसाळ्यात पावसाची आवक वाढल्यानंतर बिंदुसरा नदीला पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असुन दि.२३ जुलै १९८९ सारखा बिंदुसरा नदीला महापुर येऊन ३५ वर्षांपूर्वी घडलेली दुर्दैवी घटना घडु शकते. नदीकाठच्या वस्तिंना मोठ्या प्रमाणात हानी पोहोचली होती.गेल्या ३ वर्षांपासून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, युनुस शेख,सुदाम तांदळे यांनी वारंवार लेखी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे बिंदुसरा नदीपात्रात भुमाफियांचे अतिक्रमणाचे प्रमाण वाढलेले असुन नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाचा याला छुपा पाठिंबा असुन नदीपात्रात कच-यांचे ढीग, भर घालुन त्यावर प्लाटींग करणे, रस्ते बनविणे, बांधकाम करणे असे सर्रास प्रकार आढळून आले. संबंधित प्रकरणात विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रार केल्यानंतर त्याअनुषंगाने सहाय्यक आयुक्त गट अ नगरपरिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK